३) महामंडळाचे अध्यक्ष व संचालक यांचे ताब्यात असणा-या वाहनांचा उपयोगही सदर काळात होणार नाही याचीही दक्षता घ्यावी.

४) जिल्हाधिकारी यांचेकडून या विषयासंबंधात वेळोवेळी प्राप्त झालेली परिपत्रके/पत्रे यामधील सूचनांचा काटेकोरपणे अवलंब करावा व त्यांचे मार्गदर्शनाप्रमाणे कार्यवाही करावी. मा. जिल्हाधिकारी यांच्या अनुमतिशिवाय सदर काळात खाते वाहनाचा वापर करु नये.

सदर सूचनाप्रमाणे कार्यवाही न केल्यास उद्भवणा-या परिणामांचे उत्तरदायीत्व आपणावर राहील. शासनाच्या गृह व सामान्य प्रशासन विभागाकडून प्राप्त झालेल्या आदेश पत्रांच्या प्रतीमधील सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करावे व त्यामधील सूचनांचे काटेकोरपणे पालन न केल्यास आपणांस व्यक्तिशः जबाबदार धरण्यांत येईल यांची कृपया जाणीवपूर्वक नोंद घ्यावी.

प्रस्तुत प्रकरणी कांही शंका असल्यास या कार्यालयाशी तांतडीने संपर्क साधून मार्गदर्शन प्राप्त करुन घ्यावे.

या परिपत्राकाची पोंच उलट टपाली द्यावी.

सोबत : वरीलप्रमाणे.

उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचेकरितां
म. रा. मा. प. महामंडळ.

प्रत : गृह सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांना त्यांचे इंग्रजी पत्र क्र. एचडीबो/१०९४/७०७/सीआर-२७/एचडीओ-४ दि.

कक्ष अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन, यांना त्यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. एसटीसी-३४९३/३०१/पीर-१, दि. २२. २. ९४ व एचडीबो/१०९४/७०७/सीआर-२७/एचडीओ-४ दि. २३. २. ९४ चे संदर्भात सादर रवाना.

प्रत : विधि-तथ सल्लागार/मुख्य लेखाधिकारी/उप महाव्यवस्थापक(वाहतूक)/उप महाव्यवस्थापक (कवऔसं.)/उप महाव्यवस्थापक(यं. अ.) यांच्या माहितीस्तव.

उप महाव्यवस्थापक (क. व औ. सं.) करिता—

५३९४.